# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन",सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| | | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक ) | दुरध्वनी<br>२२६२१००६ | Website : https://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : cpsdhs@gmail.com |


92CL-9343

| | |
|---|---|
| **प्रतिनियुक्ती आदेश** | क्र.आसेसं/डीएचएस सीपीएस पदविका२०१७/न.क्र.१९/ /१७<br>दिनांक- 29 डिसेंबर, २०१७ |

विषय:- **डीएचएस सीपीएस-२०१७**
**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सेवांतर्गत सीपीएस पदविका अभ्यासक्रम सत्र- २०१७करिता प्रतिनियुक्ती देणेबाबत.**

संदर्भ:-
१) दि. २९/०६/२०१७ आयोजित डीएचएस सीपीएस (२०१७) समुपदेशन सत्र.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद यांचे अनुक्रमे दि.०६/१०/२०१७ व दि.१३/१०/२०१७ रोजीचे आदेश.
३) शासनाचे क्र. न्यायिक २०१७/प्र.क्र.३९४/सेवा-३ दि. १६/१२/२०१७ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, डीएचएस सीपीएस वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम २०१७ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी नीट पीजी २०१७ मधील पात्र उमेदवारांमधून दि. २९/०६/२०१७ रोजीच्या समुपदेशन सत्राव्दारे निवड करण्यात आलेली होती. निवड करण्यात आलेल्या २३ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ११ शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियमित सेवा ३ वर्षापेक्षा कमी असल्याने व तद्नंतर मा. उच्च न्यायालयामध्ये सदर प्रकरणी याचिका दाखल असल्याने प्रतिनियुक्ती आदेश देण्यात आलेले नव्हते. तथापि संदर्भ क्र. २ नुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद यांनी सदर उमेदवारांना सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कोटयामधून प्रवेश देण्याबाबत आदेशित केलेले आहे व त्याच अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. ३ नुसार सदर उमेदवारांना मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाच्या अधिन राहून कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे.

या आदेशान्वये, संचालक आरोग्य सेवा, मुंबई हे महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सन २०१७ च्या सीपीएस पदविका सत्रासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विषयांमध्ये सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता दर्शविलेल्या रुग्णालयामध्ये **पी.जी. हाऊस ऑफीसर** या पदावर प्रतिनियुक्तीने पाठविण्याचे आदेश निर्गमित करित आहेत. वैद्यकीय अधिका-यांना अभ्यासक्रमास रुजू होणे शक्य व्हावे म्हणून या आदेशाद्वारे त्यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यांना आदेश प्राप्त होताच **दि.२६/१२/२०१७ रोजी किंवा त्यापूर्वी** त्यांनी निवड केलेल्या रुग्णालयात प्रवेश घेण्यासाठी रुजू व्हावे.

**प्रतिनियुक्ती नियम व अटी खालीलप्रमाणे राहतील:-**

१) वैद्यकीय अधिका-यांची ज्या विषयासाठी निवड झाली आहे त्या विशिष्ट विभागात काम करण्याची परवानगी दयावी.
२) समुपदेशनाच्या अंतिम फेरीत उमेदवाराने निवडलेला विषय व संस्था यामध्ये कोणताही बदल करुन दिला जाणार नाही.
३) उमेदवार समुपदेशन पश्चात निवडलेल्या संस्थेत विहीत मुदतीत रुजू न झाल्यास किंवा रुजू होऊन त्यानंतर पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहील्यास किंवा कोणत्याही कारणास्तव निवड केलेली जागा अभ्यासक्रम न पूर्ण करता वाया घालविल्यास(Seat Lapse) संबंधित उमेदवाराला दंड म्हणून रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम शासनाकडे भरावी लागेल.
४) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेले वैद्यकीय अधिकारी त्यांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते शासनाची किमान २ वर्षे सेवा (रजा व अनुपस्थिती वगळून)करतील असे बंधपत्र (हमीपत्र) अभ्यासक्रमासाठी रुजू होण्यापूर्वी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील. बंधपत्रातील अटी न पाळल्यास पदविका नोंदणीधारकांना रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) एवढी बंधपत्राची रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल.
५) महाराष्ट्र नागरी सेवा नियम ९ (१६)(सी) प्रमाणे प्रतिनियुक्तीचा कालावधी व प्रवासाचा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात येईल
६) प्रशिक्षणासाठी गेलेल्यांना फक्त जाण्या-येण्याचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. मात्र प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्यांना प्रतिनियुक्तीभत्ता देय असणार नाही.
७) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांशी संबंधित संस्थाना जर काही तारणधन (Caution Money)आवश्यक असतील तर ते अदा करावे.
८) संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधिक्षक यांनी सीपीएस पदविका अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांची निवासी वैद्यकीय अधिका-यांप्रमाणे उपलब्धतेनुसार निवासाची व्यवस्था करावी.

९) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या उमेदबारांचा सर्वसाधारणपणे नियुक्तीचा कालावधी सीपीएस पदविकांसाठी सीपीएस कार्यालय, परळ, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे राहील.

१०) संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी सदर वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीने ज्या दिवशी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रुजू होतील, तसेच त्यांचा प्रतिनियुक्ती कालावधी ज्या दिवशी समाप्त होईल, त्या बाबत संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा, तसेच संचालक,आरोग्य सेवा,मुंबई यांना कळविण्यात यावे.

११) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांना प्रतिनियुक्तीकरिता विशेष भत्ता देण्यात येणार नाही.

१२) संबधित वैद्यकीय अधिका-यांनी मुळच्या पदावरुन पदमुक्त झाल्याची तारीख, तसेच संबंधित रुग्णालयात सीपीएस पदविका अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीने रुजू झाल्याची तारीख सर्व संबधितांना तसेच या संचालनालयास त्वरित कळविण्यांत यावी.

१३) **दि.२६/१२/२०१७ पर्यंत किंवा त्यापूर्वी** वैद्यकीय अधिका-यांना संबंधित रुग्णालयात रुजू होणे बंधनकारक असल्यामुळे संचालनालय स्तरावरुन त्यांना या आदेशाद्वारे कार्यमुक्त केले आहे. रुजू अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांचे वेतन प्रचलित नियमानुसार संचालनालय स्तरावरुन अदा करण्यात येईल.

१४) वैद्यकीय अधिका-यांनी त्यांचा सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर संबंधित रुग्णालयातून पदमुक्त होऊन संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथे हजर व्हावे आणि त्यानंतर तात्काळ संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांच्याकडे पुढील पदस्थापनेचे आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी पत्रव्यवहार करावा.

१५) संबंधित रुग्णालयाने सीपीएस पदविका अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असलेल्या वैद्यकीय अधिका-यांचा प्रतिनियुक्ती कालावधी समाप्त झाल्याबाबतची सूचना संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना एक महिना आगाऊ कळवावी, जेणेकरुन सदरहु अधिका-यांना पदस्थापना देता येईल.

१६) उमेदवाराने सीपीएस ऑफीस, परळ, मुंबई येथे नोंदणी (Enrollment) ची प्रक्रिया पूर्ण करावी व त्यानंतर त्यांची मूळ प्रमाणपत्रे (डीएचएस सीपीएस मार्गदर्शक पुस्तिका २०१७ च्या मुद्दा क्र. १३.२ नुसार) तसेच पदविके पश्चात २ वर्षे शासन सेवा करणे बाबतच्या करारनाम्याची प्रत (पृष्ठ क्र. ४१) आरोग्य सेवा संचालनालयामध्ये सादर करावे.

१७) सदर प्रकरणी प्रवेशाचे आदेश हे मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद अनुक्रमे दि. ०६/१०/२०१७ व दि. १३/१०/२०१७ रोजीच्या आदेशाच्या पूर्ततेसाठी करण्यात येत असून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर प्रवेश पूर्वदाहरण म्हणून समजण्यात येऊ नये.

१८) वरील नियमांतील कोणत्याही नियमाच्या तरतुदी बदल वाद निर्माण झाल्यास/अर्थाबाबत शंका उपस्थित करण्यात आल्यास याबाबत मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेली स्पष्टीकरणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील. वरील नियमात कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता/सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील.

**संचालक, आरोग्य सेवा,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रति,**
संबंधित वैद्यकीय अधिकारी.

**प्रत सस्नेह अग्रेषित-**
संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक.

**प्रत माहिती साठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-**
१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,(संबंधित जिल्हा परिषद)
२) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व)
३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (संबंधित जिल्हा)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा)
५) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय (संबंधित जिल्हा)
६) जिल्हा कोषागार अधिकारी, (संबंधित जिल्हा)
७) महालेखाकार महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर.
८) अध्यक्ष, कॉलेज ऑफ फिजीशियन ॲन्ड सर्जन्स, परेल, मुंबई.

**प्रत सविनय सादर:-**
१) मा.प्रधान सचिव, सा.आ.वि. (सेवा-३) मंत्रालय, मुंबई.
२) मा. आयुक्त आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

# List of in-service candidates selected for DHS CPS Courses 2017

**Date - 21/12/2017**

| Sr. No | SML No. | Subject | Name of Institution | Candidate Name | Main Category | Selected Category | Selection Quota | In-Service Medical Officer/ Private Candidates |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | DCH | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Sayed Arshad Miyan | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 2 | 10 | DGO | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Fafat Shriram Omprakash | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 3 | 13 | DGO | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Shattari Tahaniyat Banu Abdul Hafij | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 4 | 14 | DCH | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Shaikh Tauqeer Ahmed Shaikh Jilani | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 5 | 17 | DOMS | Daga Memorial Govt. Women Hospital, Nagpur | Deotale Bhanupriya Bandu | SC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 6 | 19 | DCH | Civil Hospital, Nashik | Khairnar Sujit Shivaji | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 7 | 21 | DCH | District Hospital Bhandara | Meshram Archana Avinash | SC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 8 | 22 | DGO | Civil Hospital, Osmanabad | Mane Swapnali Sureshrao | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 9 | 23 | DGO | District Hospital, Beed | Morale Deepashri Diliprao | NT-3(D) | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 10 | 28 | DCH | District Hospital, Aundh Camp, Pune | Patil Manoj Pundlik | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 11 | 29 | DGO | Civil Hospital, Ahmednagar | Tuwar Prashant Nanasaheb | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |